विषयः- कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत. (जिल्हयातील सर्व बँकातुन अनुदान व पीक विमा वाटपाबाबत)

## जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष/टे-१ /कोरोना/सीआर-
दि. १३/०४/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

४) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दि.२३.०३.२०२० व दि.३१.०३.२०२०.

**आदेशः-**

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

त्या अनुषंगाने साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्या अधिकाराचा वापर करुन, नांदेड जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी नांदेड जिल्हयातील सर्व बँकातुन होणारे पीक विमा, कर्ज वाटप व शासनाकडून देण्यात येणारे सर्व अनुदानाचे वाटप पुढील आदेशापर्यंत बंद करण्याचे आदेशित करण्यात आले होते. बँकाचे इतर व्यवहार या पूर्वी दिलेल्या निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन नियमितपणे चालु राहतील असे सुचित करण्यात आले होते.

तथापि, जिल्हयातील शेतक-यांची आर्थिक समस्या विचारात घेवून उपरोक्त प्रमाणे संदर्भीय आदेश क्र. ४ नुसार देण्यात आलेले आदेश याव्दारे रद्द करण्यात येत आहेत. तसेच, याव्दारे जिल्हयातील सर्व बँकांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त शाखांमधुन शेतक-यांना वाटप करण्यात येणारे शासकीय अनुदान व पिक विम्याच्या रक्कमा सामाजिक अंतर (Social Distance) राखुन, टोकन पध्दतीचा वापर करुन, स्वंयसेवकांची मदत घेवून व वेळेचे नियोजन करुन सदरची कामे पार पाडावित. या उपरही ग्राहकांकडून सामाजिक अंतर राखण्यास सहकार्य मिळत नसल्यास संबंधित शाखेचे शाखाधिकारी यांनी नजिकच्या पोलीस स्टेशनकडून पोलीस सहकार्य घेवून कामकाज करावे. याशिवाय अत्यावश्यक नसलेली कामे (जसे, पास बुक नोंद करुन देणे, नविन खाते उघडणे व इतर) अशी कामे या काळात करण्यात येवू नयेत.

Scanned with CamScanner

तसेच, पोलीस अधीक्षक, नांदेड यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी जिल्हयातील जिल्हा बँकेच्या शाखांकडून सदर कामी पोलीस संरक्षणाची मागणी केल्यास त्यांना निशुल्क पोलीस संरक्षण देणेसाठी जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला आपले स्तरावरुन सुचित करावे.

**(डॉ. विपीन इटनकर)** भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

१) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
२) पोलीस अधीक्षक, नांदेड
३) व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, नांदेड
४) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड
५) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
६) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

OFFICE OF THE COLLECTOR * NANDED *

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned with CamScanner